# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांची
# समष्टी साधना व आध्यात्मिक अधिकार

## विषयसूची

१. डॉ. जयंत आठवले यांचे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांचा संक्षिप्त परिचय ६

२. ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ७

३. ग्रंथाचे मनोगत ९

४. वाचकांना सूचना ! १२

## ग्रंथाची अनुक्रमणिका

(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)

प्रकरण १. डॉ. आठवले यांची व्यष्टी आणि समष्टी साधना १३

१ उ. डॉ. आठवले यांना स्वतःच्या साधनेच्या संदर्भात ध्यानातून मिळालेली उत्तरे २६

१ ए. डॉ. आठवले यांनी स्वतःची वर्षानुसार काढलेली आध्यात्मिक पातळी ५४

१ ओ. ‘डॉ. आठवले यांच्या माध्यमातून ईश्वरी संकल्प कसे कार्य करतो ?’, हे दर्शवणारे सूक्ष्म ज्ञानाविषयीचे चित्र ५८

प्रकरण २. डॉ. आठवले यांची आध्यात्मिक उन्नती ६२

२ अ. गुरुप्राप्तीनंतर ६ मासांत डॉ. आठवले यांचा नामजप अखंड होऊ लागणे ६२

२ इ. डॉ. आठवले काळाच्या बंधनाच्या पलीकडे जाणे ६२

२ उ. गुरूंनी डॉ. आठवले यांना सगुणातून निर्गुणाकडे नेणे ६३

२ ओ. डॉक्टरांच्या उन्नतीविषयी इतरांना जाणवलेली सूत्रे ६५

२ औ. डॉक्टरांच्या आध्यात्मिक अवस्थांविषयीचे ईश्वरी ज्ञान ! ६६

**प्रकरण ३. गुरूंनी डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक अधिकाराविषयी काढलेले उद्‌गार ! ६३**

३ आ. गुरूंनी डॉक्टरांच्या आध्यात्मिक अधिकाराविषयी भक्तांना दिलेल्या अनुभूती ७८

३ इ. डॉक्टरांनी घडवलेल्या साधकांविषयी गुरूंचे गौरवोद्‌गार ! ७९

**प्रकरण ४. गुरूंनी डॉ. आठवले यांना दिलेले आशीर्वाद ! ८०**

४ अ. वर्ष १९८८ आणि वर्ष १९९३ – ‘लोक याला (डॉ. आठवले यांना) पूजतील !’ ८०

४ आ. वर्ष १९९० – ‘तू किताबोंके उपर किताबे लिखेगा ।’ ८३

४ इ. वर्ष १९९२ ते १९९५ – ‘अध्यात्मप्रसार करा !’ ८४

४ ई. वर्ष १९९३ – ‘डॉक्टर, तुम्ही आम्हाला तन-मन-धन दिले. आम्ही तुम्हाला ज्ञान, भक्ती आणि वैराग्य दिले !’ ८६

४ उ. वर्ष १९९४ – ‘पुढे तुमचे (डॉ. आठवले यांचे) सहस्रो शिष्य होतील !’ ८७

४ ऊ १. ‘गोव्याला आपले कार्यालय होईल !’ ८७

४ ऊ २. ‘तुमचे लिखाण आपोआप होईल !’ ८७

**प्रकरण ५. डॉ. आठवले यांच्याविषयी संत, सप्तर्षी आणि देवता यांनी काढलेले गौरवोद्‌गार ! ९०**

५ इ. श्री देव हालसिद्धनाथ यांनी भाकणुकीद्वारे काढलेले उद्‌गार ! ९९

**प्रकरण ६. डॉ. आठवले यांना आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती १०१**

६ आ. गुरूंनी शक्ती दिल्यानंतर डॉ. आठवले यांनी अनुभवलेली आध्यात्मिक अवस्था १०१

६ ओ. वर्ष २०२१ पासून डॉक्टरांना ब्रह्मानंदाची अनुभूती येणे १०५

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य १०८**

# विषयसूचीतील क्रमांक ३

## ग्रंथाचे मनोगत

‘आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळ वेळ मग त्यासी ।।’, अशी श्री गुरूंची महती वर्णिली आहे. प.पू. भक्तराज महाराज यांनी डॉ. जयंत आठवले यांचा ‘शिष्य’ म्हणून स्वीकार केल्यानंतर अल्पावधीतच त्यांना ‘आपणासारिखे’ केले ! अवघ्या ३ वर्षांनीच गुरु सर्वांसमोर डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक अधिकाराचे कोडकौतुक गायला लागले. हे अधिकार, तसेच गुरु अन् काही संत यांनी डॉ. आठवले यांच्याविषयी काढलेले गौरवोद्गारही प्रस्तुत ग्रंथात दिले आहेत. काही अन्य पंथीय संतांनीही डॉ. आठवले यांचे आध्यात्मिक सामर्थ्य ओळखून त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे, हेही विशेष ! यावरून डॉ. आठवले यांच्या असामान्य आध्यात्मिक विभूतीमत्वाचा परिचय होतो.

सध्या साधक आपत्काळाचे चटके सोसत असतांनाही सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्यावर श्रद्धा ठेवून हिंदु राष्ट्र-स्थापनेच्या कार्यासाठी कार्यरत आहेत. प्रस्तुत ग्रंथामुळे साधकांची सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांविषयी असलेली श्रद्धा आणि भाव आणखी वाढेल. त्यामुळे आगामी भीषण आपत्काळात कितीही महाभयंकर संकटे ओढवली, तरी साधकांच्या अंतःकरणातून पुनःपुन्हा शब्द उमटत रहातील, ‘अरे, घाबरतोस कशासाठी ? प.पू. डॉक्टर आहेत ना !’ यासाठीच या ग्रंथात हे सारे आशीर्वाद आणि गौरवोद्गार आम्ही समाविष्ट केले आहेत. ‘सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे व्यक्तीस्तोम माजवण्यासाठी किंवा व्यावसायिक हेतू डोळ्यांसमोर ठेवून त्यांची महती वाढवण्यासाठी केलेला हा प्रयत्न आहे’, अशा हीन भावनेने याकडे कोणी पाहू नये.

गुरूंचे आशीर्वादच शिष्याचे सामर्थ्य आणि कीर्ती वाढवतात. गुरूंच्या आशीर्वादामुळे आजही सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले अखिल

मानवजातीच्या उद्धारासाठी धर्मसंस्थापनेचे, म्हणजेच हिंदु राष्ट्र-स्थापनेचे दिव्य कार्य करत आहेत. इतकेच नव्हे, तर हे कार्य करणारे सहस्रो साधकही ते घडवत आहेत ! हे त्यांचे अद्वितीय वैशिष्ट्य आहे. शिष्याला गुरूंचे आशीर्वाद लाभण्यासाठी शिष्याची साधनाही तशीच तोलामोलाची असावी लागते. गुरूंप्रती संपूर्ण समर्पितभाव, गुरुकार्याची पराकोटीची तळमळ, समष्टी कल्याणाचा व्यापक विचार इत्यादी गुणांचा समुच्चय शिष्यात असावा लागतो. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्यात हे गुण असल्यामुळे त्यांना गुरूंचे आशीर्वाद लाभले आणि ते फलद्रूपही झाले ! यावरून सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांची साधना किती उच्च श्रेणीची होती, हे लक्षात येते. त्यांनी केलेली व्यष्टी आणि समष्टी साधना यांचा संक्षिप्त गोषवाराही ग्रंथात मांडला आहे.

आतापर्यंत अनेक संत-महात्मे होऊन गेले. साधकावस्थेपासून ब्रह्मपदाच्या प्राप्तीपर्यंतच्या त्यांच्या साधनाप्रवासात त्यांच्या आंतरिक अवस्थांमध्ये घडलेले पालट, त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीचे मोजमापन इत्यादी इतरांना काहीच कळू शकले नाही. संत अहंविरहित असल्याने स्वतःहून हे सर्व सांगतही नाहीत. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी मात्र साधकांना हे सर्व शिकता यावे, यासाठी 'स्वतःच्या उन्नतीचे मोजमापन करता येईल', अशी सूत्रे त्यांच्या साधकावस्थेपासून नोंद करून ठेवली, तसेच यासंदर्भात त्यांनी पुढे सनातनच्या ज्ञान-प्राप्तकर्त्या साधकांकडून जाणूनही घेतले. ही सर्व अमूल्य माहितीही या ग्रंथात अंतर्भूत आहे. हे या ग्रंथाचे निराळेपण आहे.

वर्ष १९९० पासून गुरु वेगवेगळ्या प्रकारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा आध्यात्मिक अधिकार सर्वांच्या लक्षात आणून देत असतांनाही तेव्हापासून आजपर्यंत सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर स्वतःला गुरूंचा शिष्यच समजतात आणि शिष्यभावानेच सनातनच्या आश्रमात रहातात ! हेही त्यांचे एक वैशिष्ट्यच आहे. अशा अत्युच्च कोटीतील

संतांच्या मार्गदर्शनानुसार साधना करण्याचे भाग्य मिळायला जन्मजन्मांची पुण्याई असावी लागते. आपल्या सर्वांना हे भाग्य लाभले आहे. सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांचा जन्म जणू केवळ साधकांच्या उद्धारासाठीच झालेला आहे. त्यांच्यासारखे गुरु आज संपूर्ण पृथ्वीवर शोधूनही सापडणार नाहीत. आजपर्यंत साधकांवर आलेल्या सर्व संकटांच्या वेळी त्यांनीच साधकांची सर्वतोपरी काळजी घेतली आहे. 'गुरु हाच भगवंत आहे. गुरूंसाठीच माझा जन्म आहे', असा भाव साधकांनी ठेवून त्यांच्या मार्गदर्शनानुसार साधना केल्यास साधकांचे घोर आपत्काळातही रक्षण तर होईलच, तसेच साधक मोक्षासही जातील. या ग्रंथाच्या माध्यमातून 'सर्वांनाच अशी तळमळीने साधना करण्याची बुद्धी आणि प्रेरणा होवो', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !'

**– (पू.) संदीप आळशी** (१२.११.२०२२)

(ग्रंथमालिका 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे चरित्र' आणि उपमालिका 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा साधनाप्रवास' यांची अधिक ओळख 'साधनाप्रवास : खंड १' यामध्ये दिली आहे.) F (DrSP-AdhA + SStSA-L)


**'डॉ. आठवले यांचा साधनाप्रवास' या ग्रंथमालिकेतील पहिला खंड !**



**परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांची गुरुभेट आणि त्यांनी गुरुंकडून शिकणे**

- डॉ. आठवले साधनेकडे वळण्याची कारणे
- गुरुप्राप्तीपूर्वी केलेला अध्यात्मप्रसार
- गुरु प.पू. भक्तराज महाराज यांनी डॉ. आठवले यांना नामसाधना, अहं-निर्मूलन, साक्षीभाव, अद्वैताकडे वाटचाल इत्यादींविषयी शिकवणे
- डॉ. आठवले यांनी अल्पावधीतच गुरुचरणी केलेले सर्वस्वाचे अर्पण